सुरक्षा विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
पुणे-४११ ००७.

दिनांक : २८ मार्च, २०२५

# जाहीर प्रकटन

सर्व संबंधितांना कळवण्यात येते की,

१. दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी रात्री ०९.१५ च्या सुमारास विद्यापीठ परिसरात तीन विद्यार्थिनींसमोर अश्लील कृत्य करणाऱ्या व्यक्तीविरुध्द विद्यापीठाने भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ७४ नुसार चतुःश्रृंगी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी त्यावर त्वरित कारवाई करुन संबंधित आरोपीला अटक केली आहे.

२. या संबंधाने ज्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे चौकशीअंती आढळून आले आहे. त्यांच्याविरुध्द विद्यापीठाने प्रशासकीय कारवाई केली आहे.

३. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी विद्यापीठाने सुरक्षा हेल्पलाईन तातडीने सुरु केली आहे.

४. या बाबत संबंधित विद्यार्थिनींना मानसिक धक्क्यातून सावरण्यासाठी समुपदेशन करण्याबाबतही विद्यापीठाने कार्यवाही केली आहे.

अशा प्रकारच्या घटना विद्यापीठात पुन्हा घडू नयेत यासाठी विद्यापीठ कायम सतर्क व दक्ष राहील. या घटनेबाबत आवश्यकती सर्व काळजी प्रशासन घेत असून आवश्यकती कारवाई केली आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

-----

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सुरक्षा विभाग पुणे-७.



Scanned with OKEN Scanner